**International Journal of Advance and Applied Research**
**www.ijaar.co.in**
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 18** **March - April - 2025**

# शास्वत ग्रामीण विकास

**प्रा. प्रवीण सा. फाळके**
*गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ (महा.)*
*Corresponding Author –प्रा. प्रवीण सा. फाळके*
**DOI - 10.5281/zenodo.15245359**

***सारांश:***

*या संशोधन लेखात शाश्वत ग्रामीण विकास या संकल्पनेचा अभ्यास करण्यात आला आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागावर अस्तित्वात असलेल्या मर्यादित स्वरूपाच्या साधन संपत्तीचे अस्तित्व संपुष्टात येणाऱ्या मार्गावर आहे. म्हणून साधन संपत्तीचा योग्य व नियोजनपूर्वक वापर होणे महत्त्वाचे आहे. साधनसंपत्तीचे संवर्धन म्हणजे साधन संपत्तीचा वापर किंवा उत्पादन कमी करणे नसून नियोजन व काटकसरीने वापर करून भविष्यकालीन पिढीसाठी साधन संपत्ती कशी जतन करता येईल, या दृष्टिकोनातून विचार करणे होय. शाश्वत ग्रामीण विकास ही संकल्पना ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान सुधारणे, नैसर्गिक संसाधनाचे जतन करणे, भविष्यातील पिढ्यासाठी संधी निर्माण करणे यावर आधारित आहे. या संशोधनात शाश्वत ग्रामीण विकासाची आवश्यकता आणि उद्दिष्टांची चर्चा करण्यात आली आहे. त्यात पर्यावरणीय साधन संपत्तीचे संरक्षण, ऊर्जा, शेती, पाणी, अन्न आणि सामाजिक सांस्कृतिक घटकांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे अधोरेखित केले आहे. शाश्वत विकासाची 17 ध्येये आहेत आणि त्याचे ग्रामीण विकासाशी असलेले नाते स्पष्ट करण्यात आले आहे. या ध्येयामध्ये पर्यावरण संतुलन, सामाजिक व आर्थिक विकास, गरिबी निर्मूलन, शाश्वत शेती, पिण्यायोग्य पाणी, शिक्षण, आरोग्य आणि महिला सक्षमीकरण यांचा समावेश आहे.*

***शोधसंज्ञा :पर्यावरण संतुलन, गरिबी निर्मूलन, शाश्वत शेती, लोकसंख्या, अन्न समस्या, महिला सक्षमीकरण.***

**प्रस्तावना**:

शाश्वत ग्रामीण विकास ही एक अशी प्रक्रिया आहे, जी पर्यावरणाचा ऱ्हास न करता ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान सुधारते. यामध्ये आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय घटकांचा समावेश असतो. शाश्वत ग्रामीण विकास ही संकल्पना ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान सुधारणे, नैसर्गिक संसाधनांचे जतन करणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी संधी निर्माण करणे यांवर आधारित आहे.

**शाश्वत ग्रामीण विकासाची संकल्पनाः**

सर्वसमावेशक विकासः ग्रामीण भागातील सर्व घटकांचा, विशेषतः दुर्बल घटकांचा विकास करणे.

पर्यावरणीय संतुलनः नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करणे आणि पर्यावरणाचे रक्षण करणे.

आर्थिक विकासः स्थानिक लोकांना रोजगार आणि उत्पन्नाच्या संधी उपलब्ध करून देणे.

सामाजिक विकासः शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि इतर सामाजिक सुविधांमध्ये सुधारणा करणे.

स्थानिक सहभागः विकास प्रक्रियेत स्थानिक लोकांचा सक्रिय सहभाग घेणे.

**शाश्वत ग्रामीण विकासाची आवश्यकताः**

**गरिबी निर्मूलनः** ग्रामीण भागातील गरिबी कमी करणे आणि लोकांचे जीवनमान सुधारणे.

**स्थलांतर थांबवणेः** ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून शहरांकडे होणारे स्थलांतर थाबवणे.

**पर्यावरणाचे रक्षणः** नैसर्गिक संसाधनाचे योग्य व्यवस्थापन करणे आणि पर्यावरणाचे रक्षण करणे.

कृषी विकासः शेतीमध्ये आधुनिक तत्रज्ञानाचा वापर करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे

**सामाजिक न्यायः** ग्रामीण भागातील सर्व लोकांना समान संधी उपलब्ध करून देणे.

**शाश्वत ग्रामीण विकासासाठी उपाययोजनाः**

**कृषी विकासः** आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, जलसंधारण, मृदा सवर्धन आणि पीक विविधीकरण.

**ग्रामीण उद्द्योगः** स्थानिक लोकांना रोजगार देण्यासाठी लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे.

**शिक्षण आणि आरोग्यः** ग्रामीण भागातील शाळा आणि आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करणे.

**पायाभूत सुविधाः** रस्ते, वीज, पाणी आणि दळणवळणाच्या सुविधांमध्ये सुधारणा करणे

**स्थानिक स्वराज्य संस्थाः** ग्रामपंचायती आणि इतर स्थानिक संस्थांना अधिक अधिकार देणे आणि त्यांना सक्षम करणे.

**महिला सक्षमीकरणः** महिलांना शिक्षण, रोजगार आणि निर्णय प्रक्रियेत समान संधी उपलब्ध करून देणे.

पर्यावरण संरक्षणः नैसर्गिक ससाधनाचे योग्य व्यवस्थापन करणे, वनराई वाढवणे आणि प्रदूषण कमी करणे.

शाश्वत ग्रामीण विकासामुळे ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान सुधारण्यास मदत होईल आणि देशाच्या विकासाला चालना मिळेल.

**अध्ययनाचे उद्देश :**

1) शाश्वत विकास संकल्पना समजून घेणे.

2) शाश्वत ग्रामीण विकाससमोरील आव्हानाचे अध्ययन करणे.

3) शाश्वत ग्रामीण विकास आव्हानांवरील उपाययोजनांचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती :**

शाश्वत ग्रामीण विकास या विषयाच्या अध्ययनाकरिता दुय्यम साधन सामग्रीचा उपयोग करण्यात आला. त्यासाठी विषयास अनुसरून असणारी पुस्तके, लेखे, मासिक व विशेशंकाचा आधार घेण्यात आला. तसेच केंद्र व राज्य सरकारच्या शाश्वत विकासाच्या विविध योजनांची माहिती देणारी पुस्तिका व वेबसाईटचा आधार घेण्यात आला.

शास्वत ग्रामीण विकासाची गरज अनेक कारणांमुळे आहे, जी खालीलप्रमाणेः

**नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन :**

ग्रामीण भागात नैसर्गिक संसाधनांची विपुलता असते, जसे की जमीन, पाणी, वनसंपदा इत्यादी. शाश्वत विकासामुळे या संसाधनांचे योग्य व्यवस्थापन करणे शक्य होते, ज्यामुळे त्यांची उपलब्धता दीर्घकाळ टिकून राहते, यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होते आणि हवामान बदलाचे दुष्परिणाम कमी होतात.

**आर्थिक स्थिरता आणि रोजगार निर्मिती :**

शाश्वत ग्रामीण विकासातून शेती, पशुपालन, मत्स्यपालन आणि ग्रामीण उद्योगांना प्रोत्साहन मिळते. यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी वाढतात आणि लोकांचे उत्पन्न सुधारते.स्थानिक पातळीवर वस्तू आणि सेवांची निर्मिती झाल्यामुळे आर्थिक स्थिरता येते.

**सामाजिक विकास आणि जीवनमानाचा दर्जा :**

शाश्वत विकासामुळे शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होते. ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान सुधारते आणि त्यांना शहरांप्रमाणेच सुविधा उपलब्ध होतात. सामाजिक विषमता कमी होते आणि लोकांमध्ये एकोपा वाढली.

**स्थलांतर रोखणे:**

ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी वाढल्यास आणि जीवनमानाचा दर्जा सुधारल्यास शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होते. यामुळे शहरांवरचा ताण कमी होतो आणि ग्रामीण भागातील लोक आपल्या गावातच आनंदी जीवन जगू शकतात.

**अन्नसुरक्षा आणि आत्मनिर्भरता:**

शाश्वत शेती पद्धतींमुळे अन्न उत्पादन वाढते आणि अन्नसुरक्षा सुनिश्चित होते. ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर अन्न उत्पादन झाल्यास, लोकांची गरज पूर्ण होते आणि ते आत्मनिर्भर बनतात.

**सांस्कृतिक वारसा जपणे:**

ग्रामीण भागात अनेक सांस्कृतिक परंपरा आणि कला जिवंत असतात. शाश्वत विकासामुळे या परंपरा आणि कलांचे जतन करणे शक्य होते. यामुळे ग्रामीण भागाची ओळख आणि महत्त्व टिकून राहते.

**राष्ट्रीय विकासात योगदानः**

ग्रामीण भागाचा विकास झाल्यास, देशाच्या एकूण विकासाला हातभार लागतो. यामुळे गरीबी कमी होते, आर्थिक विषमता कमी होते आणि सामाजिक न्याय प्रस्थापित होतो.

**शाश्वत ग्रामीण विकासासमोर आव्हाने:**

ज्यामुळे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधणे कठीण झाले आहे. या आव्हानांमध्ये खालील गोष्टींचा समावेश होतोः

**आर्थिक आव्हानेः**

**शेतीवरील अवलंबित्वः** ग्रामीण भागातील बहुतांश लोक शेतीवर अवलंबून आहेत, जी हवामानातील बदल आणि बाजारातील अस्थिरता यासारख्या घटकांमुळे असुरक्षित आहे.

**रोजगाराचा अभावः** ग्रामीण भागात पुरेसे रोजगार उपलब्ध नाहीत, त्यामुळे लोकांना शहरांकडे स्थलांतर करावे लागते.

**गरिबी आणि असमानताः** ग्रामीण भागात गरिबीचे प्रमाण जास्त आहे आणि उत्पन्नातील असमानता देखील मोठ्या प्रमाणात आहे.

**कर्जबाजारीपणाः** शेतकरी आणि ग्रामीण भागातील लोक अनेकदा कर्जबाजारी असतात, ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती आणखी बिकट होते.

**सामाजिक आव्हानेः**

**शिक्षणाचा अभावः** ग्रामीण भागात शिक्षणाची गुणवत्ता आणि उपलब्धता कमी आहे, ज्यामुळे लोकांच्या विकासावर परिणाम होतो.

**आरोग्य सुविधांचा अभावः** ग्रामीण भागात चांगल्या आरोग्य सुविधांचा अभाव आहे, ज्यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात येते.

**पाणी आणि स्वच्छतेचा अभावः** ग्रामीण भागात पिण्याचे स्वच्छ पाणी आणि स्वच्छता सुविधांचा अभाव आहे, ज्यामुळे आरोग्याच्या समस्या वाढतात.

**जातीय आणि लैंगिक भेदभावः** ग्रामीण भागात जातीय आणि लैंगिक भेदभाव मोठ्या प्रमाणात आढळतो, ज्यामुळे सामाजिक असमानता वाढते

**महिला सक्षमीकरणाचा अभावः** ग्रामीण भागात महिलांना समान संधी मिळत नाहीत, ज्यामुळे त्यांचे सक्षमीकरण होत नाही.

**पर्यावरणीय आव्हाने:**

**नैसर्गिक संसाधनांचा -हासः** ग्रामीण भागात नैसर्गिक संसाधनांचा -हास मोठ्या प्रमाणात होत आहे, ज्यामुळे पर्यावरणावर नकारात्मक परिणाम होतो

**हवामान बदलः** हवामान बदलामुळे दुष्काळ, पूर आणि इतर नैसर्गिक आपत्तींची वारंवारता वाढली आहे. ज्यामुळे ग्रामीण भागातील जीवनमान प्रभावित होते.

**शासकीय आणि प्रशासकीय आव्हाने:**

**योजनाची प्रभावी अंमलबजावणी:** ग्रामीण विकासासाठी असलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही, ज्यामुळे अपेक्षित परिणाम मिळत नाहीत.

**भ्रष्टाचार:** ग्रामीण भागात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात आढळतो, ज्यामुळे विकास योजनामधील निधीचा योग्य वापर होत नाही.

**स्थानिक स्वराज्य संस्थाचे दुर्बल स्वरूप:** ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत) दुर्बल आहेत, ज्यामुळे त्यांचा विकास प्रक्रियेत प्रभावी सहभाग नसतो.

**शाश्वत ग्रामीण विकासासाठी उपाययोजना:**

**गरिबी निर्मूलन:** गरिबी निर्मूलनासाठी रोजगार निर्मिती आणि उत्पन्न वाढवण्याच्या योजना राबवणे आवश्यक आहे.

**शिक्षण आणि आरोग्य सुधारणा:** ग्रामीण भागात चागल्या शिक्षण आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

पायाभूत सुविधांचा विकास ग्रामीण भागात रस्ते, पाणी, वीज आणि स्वच्छता यांसारख्या पायाभूत सुविधांचा विकास करणे आवश्यक आहे

**पर्यावरणीय संरक्षण:** पर्यावरणीय समस्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**शेतीचा विकास:** शेतीचा विकास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे

**महिला सक्षमीकरण:** महिलांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण: स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक अधिकार आणि संसाधने देणे आवश्यक आहे.

**तंत्रज्ञानाचा वापर:** ग्रामीण विकासासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे.

**लोकसहभाग:** ग्रामीण विकासाच्या योजनांमध्ये लोकाचा सहभाग वाढवणे आवश्यक आहे.

**शाश्वत ग्रामीण विकासासाठी सरकारी योजना:**

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा)
- पीएम निवास योजना ग्रामीण (पीएमवाय-जी)
- पीएम ग्राम योजना (पीएमजीएसवाय)
- दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना (डीडीयू-जीकेवाय)

या योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांना रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

शाश्वत ग्रामीण विकास हे एक दीर्घकालीन उद्दिष्ट आहे यासाठी सरकार, स्वयंसेवी संस्था, खाजगी क्षेत्र आणि स्थानिक लोक यांच्या एकत्रित प्रयत्नांची गरज आहे

**निष्कर्ष :**

शाश्वत विकासाची तत्वे अंगीकारणे भारतासारख्या विकसनशील देशाला अत्यावश्यक आहे. शाश्वत विकास अभ्यासाचे महत्त्व आणि आवश्यकता आजच्या काळात अधिकाधिक वाढत आहे. पर्यावरण संरक्षण, सामाजिक समस्या, हवामान बदल, पाणीटंचाई, अन्नसुरक्षा आणि ऊर्जा संकट यासारख्या जागतिक समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने ग्रामीण शाश्वत विकासाची धोरण भारताने अंबलावे ही एक आवश्यकता झाली आहे. त्यासाठी शाश्वत विकासाच्या तत्त्वावर आधारित ग्रामीण विकास धोरण तयार करणे व पर्यावरण पूरक आणि सामाजिक दृष्ट्या जबाबदार विकासाला प्रोत्साहन देऊन भविष्यातील पिढ्यांना सुरक्षित व समृद्ध जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून देणे हीच शाश्वत ग्रामीण विकासाचे उद्देश आहेत.

**संदर्भ:**


1. डॉ. अरुण शेळके, "शाश्वत विकास उद्दिष्टे" पिंपळापुरे प्रकाशन, 1995
2. डॉ. किशोर भांबुळकर, "शाश्वत ग्रामीण विकास योजना मासिक" 2018
3. पवार किशोर आणि इतर, "पर्यावरण विज्ञान", प्रगती बुक्स प्रा. लि. 2005
4. शाश्वत विकास, केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना, राज्य ग्रामीण विकास संस्था, पुणे
5. Dr. Pisami J. Sustainable development historical roots of concept
6. Emv. science 2006
7. Dr. Kadam R.C. Sustainable development and farming, Sara publication New Delhi 2016
8. https://sustainabledevelopment.un.org
9. https://wikipedia.org